# ऑपरेशन सिंदूर विजय रॅली

महाविद्यालयातील एन सी सी/ एन एस एस व शारीरिक शिक्षण विभागातील सर्व विद्यार्थ्यांची गुरुवार दिनांक 15 मे 2025 रोजी सकाळी ठीक ८:०० वाजता आपले महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (तहसील कचेरी) पर्यंत ऑपरेशन सिंदूर विजय रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीमध्ये भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ विजयी घोषणा देण्यात आल्या. स्वयंसेवक, प्राध्यापक v कर्मचारी हातामध्ये तिरंगा ध्वज व फलक घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इस्लामपूर येथे ऑपरेशन सिंदूर विजयी रॅलीचे आयोजन

दि. 15/05/2025 रोजी इस्लामपूर येथे ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे यशवंतराव चव्हाण महाविद्याल ते तहसील कार्यालय इस्लामपूर या मार्गावरती या रॅलीचे आयोजन करण्यात आले या रॅलीचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे सांगली जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. गोरखनाथ किर्दत, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील शा. शि. संचालक प्रा. हेमंतकुमार नारायणकर, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज चे उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप शामराव पाटील, प्रा. डॉ. प्रकाश आठवले, मालती वसंतराव दादा पाटील कन्या महाविद्यालयातील शा.शि.संचालक प्रा. संदीप सहदेव पाटील, कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालयातील शा. शि. संचालक,प्रा. अजित शेळके, आर. आय. टी. कॉलेजचे प्रा.सचिन नलवडे, श्री.संग्रामसिंह पाटील यांनी केले. स्वयंसेवकांनी हातामध्ये तिरंगा व फलक घेऊन भारत माता की जय च्या घोषणादेत परिसरातील नागरिकांमध्ये उत्साह संचारित केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास अभिवादन करून रॅलीचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी प्रा. डॉ. गोरखनाथ किर्दत यांनी रॅलीस संबोधित करताना तरुणांनी प्रखर राष्ट्रनिष्ठा जोपासावी असे आवाहन केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा.डॉ.टी. एम. चौगले व प्राचार्य डॉ. ए.एम. जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले.




**ऑपरेशन सिंदूर विजय रॅलीमध्ये सहभागी एन.एस.एस. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व प्रशासकीय सेवक**




**ऑपरेशन सिंदूर विजय रॅलीमध्ये सहभागी एन.एस.एस. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व प्रशासकीय सेवक**

पुण्य नगरी

# In Short



इस्लामपूर : ऑपरेशन सिंदूर जनजागृती रॅलीत सहभागी झालेले विद्यार्थी व शिक्षक.

## इस्लामपुरात ऑपरेशन सिंदूर जनजागृती रॅली

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ व नागरिकांच्या जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय ते तहसील कार्यालय या मार्गावर रॅली काढण्यात आली. या रॅलीचे संयोजन प्रा. डॉ. गोरखनाथ किर्दत, प्रा. हेमंतकुमार नारायणकर, के. बी. पी. चे उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. प्रकाश आठवले, मालती कन्या कॉलेजचे प्रा. संदीप पाटील, के. आर. पी. चे प्रा. अजित शेळके, आर. आय. टी. कॉलेजचे प्रा. सचिन नलवडे, संग्रामसिंह पाटील यांनी केले. स्वयंसेवकांनी हातामध्ये तिरंगा व फलक घेऊन भारत माता की जय च्या घोषणा देत परिसरातील नागरिकांमध्ये उत्साह संचारित केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. हेमंत कुमार नारायणकर यांनी आभार मानले. प्रा. डॉ. टी. एम. चौगले, डॉ. शरद बनसोडे व प्राचार्य डॉ. ए. एम. जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले.

Sangli Edition
May 17, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# इस्लामपूर येथे 'ऑपरेशन सिंदूर' जनजागृती रॅलीस प्रतिसाद

**इस्लामपूर : पुढारी वृत्तसेवा**

येथे 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराच्या सन्मानार्थ व नागरिकांच्या जनजागृतीसाठी आयोजित रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय ते तहसील कार्यालय या मार्गावर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

रॅलीचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे सांगली जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. गोरखनाथ किर्दत, यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. हेमंतकुमार नारायणकर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील, प्रा. डॉ. प्रकाश आठवले, मालती वसंतरावदादा पाटील कन्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संदीप पाटील, कुसुमताई पाटील कन्या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अजित शेळके, आर. आय. टी. कॉलेजचे प्रा. सचिन नलवडे, संग्रामसिंह पाटील यांनी केले. प्रा. डॉ. हेमंतकुमार नारायणकर यांनी आभार मानले. प्रा. डॉ. टी. एम. चौगले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्राचार्य डॉ. ए. एम. जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

Sangli Edition
May 16, 2025 Page No. 09
Powered by: erelego.com